Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

SADBHAKTI PRAKASH

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९३) आषाढ ते भाद्रपद शके १९४३ - जुलै ते सप्टेंबर २०२१ (संयुक्तांक १० ते १२)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ४ |
| ३) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १० |
| ४) | अमृतकण | १६ |
| ५) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | १८ |
| ६) | महत्वाच्या सूचना | २४ |
| ७) | विनंती | २५ |
| ८) | निवेदन | २६ |

।। श्री सद्गुरु प्रसन्न।।



**- संपादकाचे बोल -**

**(वर्ष ९३) चैत्र, वैशाख, ज्येष्ठ मासांतील (शके १९४३)**
**(संयुक्तांक १० ते १२)**
**एप्रिल ते जून मासांतील कार्यक्रमाचा गोषवारा**

सद्भक्ति प्रकाशचा ९३वा अंक अत्यंत अल्प स्वरूपांत सादर करावा लागतो आहे. सद्गुरुंची सेवा पण काही ठराविक सद्भक्त स्वल्प प्रमाणात करतात. टाळेबंदीमुळे मंदिर बंद ठेवावे लागते. गुरुवरांना कोंडून ठेवले

जाते. तेव्हा आपणही कोंडले गेलो आहोत असे वाटते. तरीही त्यांनी आपल्या बालकांवर कृपादृष्टी ठेवावी व लवकरच दर्शनाचा लाभ द्यावा, हीच त्यांना कळकळीची विनंती आहे.

मंगळवार दि. १३.४.२०२१ (चैत्र शुद्ध प्रतिपदा) रोजी गुढीपाडवा होता.

बुधवार दि. ११.४.२०२१ (चैत्र शुद्ध नवमी) श्री रामनवमी होती. चैत्र शुद्ध नवमी म्हणजे श्री रामनवमीच्या दिवशी श्री सोहिरोबानाथ पुण्यतिथी दिन होता. श्री रामजन्मोत्सव दुपारी १२ वाजता होता. त्यावेळी काही सद्भक्तांनी अत्यंत उत्साहाने तो पार पाडला. त्यावेळी (१) बाळा जो जो रे (२) विश्व डोलारामाजि आत्मा हरि (२) छत्र सिंहासनी अयोध्येचा राजा (३) ज्याचे वंशी कुळधर्म रामसेवा ही पदे म्हणण्यांत आली.

मंगळवार दि. २७.४.२०२१ (चैत्र पौर्णिमा) श्री हनुमान जयंती. जन्मोत्सव सकाळी ६.३० वाजता झाला.

रविवार दि. ९.५.२०२१ (चैत्र कृष्ण ययोदशी) रोजी श्री अक्कलकोटस्वामी महाराज पुण्यतिथी दिन होता.

मंगळवार दि. ११.५.२०२१ला (चैत्र अमावस्या) सद्‌गुरु श्री पार्वतीमाता जयंती दिन होता. सकाळीच गाभाऱ्यांत एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व नंतर प्रार्थना म्हणण्यांत आली.

**वैशाख –**

शुक्रवार दि. १४.५.२०२१ (वैशाख शुद्ध तृतीया - अक्षय तृतीया) व श्री परशुराम जयंती होती.

सोमवार दि. १७.५.२०२१ (वैशाख शुद्ध पंचमी)ला आद्य श्री शंकराचार्य जयंती होती.

मंगळवार दि. १८.५.२०२१ (वैशाख शुद्ध षष्ठी) रोजी



श्री वामनपंडित पुण्यतिथी व श्री रामानुजाचार्य जयंती होती. प्रात:काळी गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली.

गुरुवार दि. २०.५.२०२१ (वैशाख शुद्ध अष्टमी) दुर्गाष्टमी होती.

मंगळवार दि. २५.५.२०२१ (वैशाख शुद्ध चातुर्दशी) रोजी श्री नृसिंह जयंती होती.

बुधवार दि. ९.६.२०२१ (वैशाख वद्य चतुर्दशी) रोजी गुरुवर्य श्री बाबांची पुण्यतिथी होती. प्रात:काळी गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) व शेवटी ठराविक सद्भक्तांच्या उपस्थितीत प्रार्थना म्हणण्यांत आली.

**ज्येष्ठ**

रविवार दि. २०.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध दशमी)ला गंगावतरण दिन होता.

सोमवार दि. २९.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध एकादशी) रोजी श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी दिन होता.

**: इति :**

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

२८.३.१९३१

*रामनवमी*

*पद*

*“राम दर्शनासि चला लाभ हा भला।।धृ.।।*
*रामजन्म रामनवमी नक्षत्र पुनर्वसू।*
*समय माध्यान्ह दिवा अवतार जाहला।।१।।*
*दशरथासि दशरथी पुत्र जन्मला।*
*त्रिभुवनांत जयजयकार जाहला।।२।।*
*भजकाचे कोटी अन्याय हा क्षमाकरी।*
*उद्धारितां महाराज नाही भागला।।३।।*
*शबरि कबरि बदरी फळें पदरीं बांधुनी।*
*भावबळें भुलोनियां भक्षू लागला।।४।।*
*महावीष त्र्यंबकासि अमृत लाभला।*
*पार्वतीस थोर आनंद जाहला।।५।।”*



आज रामनवमी आहे. ह्या दिवशी राम जन्मास आला. आपणाला रामाच्या मूर्तीचे जे हे रुप दिसते, ते पारमार्थिक दृष्ट्या त्याचे खरे स्वरुप नाही. कारण “यद्दृष्टं तन्नष्टं” ह्या न्यायाने दशरथाचा पुत्र जो राम, त्याचे बाह्य रुप खरे असू शकणार नाही. रामाचे खरे रुप अगदी निराळेच आहे. सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी एक अनादिचैतन्य होते. ॐकारांतील ‘अ’कार तो हेच चैतन्य. त्या शुद्ध चैतन्यावर जशी वायूची झुळूक या न्याय ‘अहं ब्रह्मास्मि’ अशी एक वृत्ती उठली. तो ‘उकार’ म्हणजे ‘अकार’ रुपी शून्यांतून त्याला फोडणारी एक रेघ निघाली. तिचा आकार सोंडेसारखा दिसतो. म्हणून तिच्या योगाने अकाराला शुंडाकार ऊकाराचे रुप प्राप्त झाले. अर्थात निर्गुण ब्रह्माला सगुण ब्रह्माचे रुप प्राप्त झाले आणि ‘साक्षित्व’ हा गुण त्याच्या अंगी आला. पुढे ह्या सगुण ब्रह्माच्या ठायी ‘एकोऽहं, बहुस्याम्’, “मी एकटा आहे, मला करमत नाही. तेव्हा मी अनेक होईन”, अशी दुसरी एक वृत्ती उठली. ती गुणमयी माया. तीच ॐकारांतील ‘मकार.’ तिनेच सर्व चतुर्दश भुवनांची उभारणी केली. ह्या चतुर्दश भुवनांमध्ये आपल्याला रामदर्शन घ्यावयाचे आहे. कुंभार नानातऱ्हेच्या आकारांचे व रंगाचे डेरे, रांजण वगैरे करितो. त्यात आपल्याला शुद्ध माती पहावयाची आहे. परंतु कुंभार ती भांडी फोडून निराळी माती दाखविणार नाही व आपणालाही तो ती फोडू देणार नाही. तेव्हा त्यात बुद्धि कुशलतेनेच माती पाहिली पाहिजे. तद्वत् ह्या चतुर्दश भुवनांतच आपल्याला रामाचे मूळरुप पहावयाचे आहे. सृष्टिभास न मोडता शुद्धब्रह्म त्यात अवलोकन करितां आले म्हणजे रामाचे दर्शन सहज होईल.

आता ह्या विश्वव्यापी रामाचे स्वरुप कसे आहे ह्याची थोडी बहुत कल्पना सोहिरोबांनी एका पदांत दिली आहे :- ***“सोहिरा म्हणे शून्याकार, रुप नाही आकार । परब्रह्म निर्विकार, आत बाहेर अवघें।। त्या देवाचे तू दर्शन घे।।”*** तेव्हा रामाला रुप नाही आणि आकार ही नाही. तो निराकार आणि निर्विकार आहे. ***“नभा सारिखें रुप ह्या राघवाचे।।”*** कोणी म्हणतात

आपणाला रामाचे कृष्णाचे, दत्ताचे अगर शंकराच्या सगुण मूर्तीचे दर्शन झाले, तेज दिसले पण तो साक्षात्कार समजू नये, कारण "यद्दृष्टं तन्नष्टं" हा सिद्धांत खोटा होणार नाही. तसेच कोणी मला भूत, भविष्य, वर्तमान समजते म्हणून मी ज्ञानी आहे असे म्हणतात, पण हे ही ज्ञान नव्हे हे खोटे ज्ञान त्याला रामाचे खरे दर्शन देऊ शकणार नाही. रामदास स्वामी म्हणतात:- ***"भूत भविष्य वर्तमान। ठाऊके आहे परिच्छिन्न। यासीही म्हणिजे ज्ञान। परि ते ज्ञान नव्हे।।"*** तसेच कोणी सकळ कला व विद्या पारंगत झाला, म्हणून त्याला रामाचे खरे स्वरुप समजेल अशातली गोष्ट नाही. ***"असो सकळ कळा प्रवीण। विद्या मात्र परिपूर्ण। तरी ते कौश्यलता परि ज्ञान म्हणोचि नये।।"*** तसेच वामन पंडित सिद्धांत म्हणून प्रतिपादन करितात की, ***"सकळ हि वश झाल्या या कला आणि विद्या। परम चतुर झाला शीकला गद्य पद्य। सदय हृदय नाही कोण मी हे कळेना। तरी मग तितुकें ते ज्ञान का हो जळेना।।"*** विश्वामित्राचे सामर्थ्य इतके होते की त्याने प्रतिसृष्टि निर्माण केली होती, परंतु ज्ञान नसल्यामुळे - त्याला आत्मारामाचे दर्शन घडले नसल्यामुळे वसिष्ठ मुनी सारखे ज्ञानी सत्पुरुष त्याला ब्रह्मर्षि म्हणत नसत. स्वरुपाचे ज्ञान असल्यावर मग शास्त्र ज्ञान नसले तरी काही बिघडत नाही.

***"सदय हृदय नाही कोण मी हे कळेना।।",*** जो पर्यंत अंत:करण कोमल शुद्ध झाले नाही, अर्थात बुद्धीतून रज तम गेले नाहीत, तो पर्यंत राम दर्शन होणे अशक्य आहे. शुद्ध अंत:करण होण्याला नवविध भक्तीसारखे दुसरे साधनच नाही. ***"चित्तशुद्धीची आता मज वाट दावीं। वेद शास्त्र पुराणांची गति सुचवावी। नवविध भक्ती निरंतर करवावी। केशव चैतन्य म्हणे भूषण तुला रे।।"*** एक एक दिवस एक एक भक्ती करून ती ईश्वराला अर्पण केल्यावर नवव्या दिवशी रामाचे दर्शन होते. रामाचा जन्म ९मीला झाला. ह्याचा अध्यात्मिक अर्थ असा आहे की नऊ दिवस नवविध भक्ती करून ती ईश्वराला अर्पण करितांच ९व्या दिवशी राम



जन्म होतो. आत्मसाक्षात्कार होतो. राम जन्म भर दुपारी बारा वाजता झाला ह्याचा पारमार्थिक अर्थ असा की ज्ञान प्राप्त झाल्यावर अज्ञान अंध:कार मुळीच उरत नाही. साधकाला जिकडे तिकडे ज्ञानाचाच प्रकाश-प्रभाव दिसतो. ***"ज्ञानार्क तो जधि दे जनाला।।"*** आत्म स्वरुपाचे - ज्ञानाचे तेज - प्रभाव किती दिव्य आहे हे रामाच्या मायीक जन्म काळ दर्शविले आहे. ***"समय माध्यान्ह दिवा अवतार जाहला।।"*** असा रामचंद्र म्हणजे बोधपुत्र कोणाला झाला ह्याचा आपण विचार करू. हा पुत्र दशरथाला झाला असे पदांत म्हटले आहे. ***"दशरथासी दशरथी पुत्र जन्मला।।"*** ह्याचा व्यवहारिक अर्थ असा आहे की अयोध्येचा राजा जो दशरथ त्याला रामचंद्र हा पुत्र झाला. पण ह्याचा पारमार्थिक अर्थ असा आहे की दशरथ म्हणजे ज्याला दहा इंद्रिये आहेत असा रथ, अर्थात् नरदेह श्रृतीनें ही नरदेहाला रथाचीच उपमा दिली आहे :- ***"आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेवच। बुद्धिंतु सारथिं विद्धि मन: प्रग्रहमेवच।।"*** अशा देहांत दशरथास बोध पुत्र झाला. ज्ञान उदयास आले. किती ही जन्म घालविलें तरी ज्ञान प्राप्त होणार नाही अशी ही अमोलिक वस्तु स्थिती ज्याला महाद्भाग्याने प्राप्त होते, त्याला किती आनंद होतो ह्याची कल्पना करणे अशक्य आहे. ही ज्ञान प्राप्ती झाल्यावर :- ***"त्रिभुवनात जयजयकार जाहला।।"*** ह्यात काही नवल नाही. दशरथाने आपणाला पुत्र व्हावा म्हणून पुत्र कामेष्टी सारखे पुष्कळ प्रयत्न केले, आणि वृद्धापकाळीं त्याला पुत्र झाला. तेव्हा त्याला किती आनंद झाला असेल हे कल्पनेच्या बाहेरचे काम आहे. तद्वत् ज्ञान बोध झाल्यावर तुकाराम म्हणतात :- ***"आनंदे दाटलीं तिन्हीं त्रिभुवनें। सर्वात्मपणें भोग झाला।।"*** ज्ञान बोध पूर्ण झाल्यावर सर्व त्रिभुवनच भगवद्रूप दिसू लागते. सीतेला रामदर्शन झाले त्यावेळी तिने आपल्या सखीजवळ असे उद्गार काढले. ***"देव जाणे हा भाव सखे माझा। जिवीं जडला स्वप्रेम रामराजा।। अंगी भरले माझिया रामवारे। रामरुपीं रंगलें चित्त सारें।। आजि पुरली तहान डोळियांची। मूर्ती पाहता राम राज याची।।***

***काय सांगू हा लाभ थोर झाला। गीत गातां आनंद तनय धाला।।"*** आनंदतन यांनी नुसती घडलेली गोष्ट निवेदन केली, तर त्यांना एवढा आनंद झाला, मग प्रत्यक्ष सीतेला किती आनंद झाला असेल ह्याची कल्पना सीताच करू शकेल.

रामाचे दर्शन कोणाला व कोणत्या उपायाने होते ह्याचे स्पष्टीकरण :- ***"शबरी कबरी बदरि फळें पदरी बांधूनी। भावबळें भुलोनियां भक्षूं लागला।।"*** ह्या दोन चरणात केले आहे. येथे दोन मुद्दे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. एक अर्पण व दुसरा भाव. अर्पण करावयाच्या वस्तूची किंमत नाही. ती अगदी कनिष्ठ प्रकारची असली तरी ती अति उत्कृष्ट फळ प्राप्ती करून देते. भगवान गीतेत म्हणतात की मला पदार्थांची आवड अगर किंमत वाटत नाही. तर मला मुख्य भाव प्रीति प्रेम पाहिजे. मला जे प्रेमाने कोणी देतो, ते मी आपला आनंदच मानून ग्रहण करितो व माझा आनंद मी त्याला देतो.

***"पुत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति।***
***तदहं भक्त्युपहृतमश्ना प्रयतात्मन:।।" (भ.गी. ९/२६)***

भिल्लीणीनें मला शुद्ध अंत:करणाने व मोठ्या प्रेमानें रानांतली बोरे आणून दिली. तिचा शुद्धभाव पाहून मी संतुष्ट झालो व तिला चिाद्रूप केले :- ***"निरखुनि रघुरायें भाव त्या भिल्लिणीचा। परम मनी सुखाने नाथ तो जानकीचा।।"***

***"महावीष त्र्यंबकासी अमृत लाभला।***
***पार्वतीस थोर आनंद जाहला।।"***

महाविष म्हणजे तमोगुण, ज्यामुळें जीवाला चौऱ्यांशी लक्ष योनी भ्रमण कराव्या लागतात. परंतु राम दर्शनाच्या योगे तमोगुणाचा नाश होऊन जीव जन्म मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होतो. हलाहल विष प्राशन केल्यामुळे शंकराच्या देहांत होत असलेली आग नुसत्या राम नामाने शांत झाली. रामाचे नुसते दर्शन होऊन भागत नाही म्हणजे नुसते ज्ञान



होऊन परम सुख प्राप्त होणार नाही. चित्तचैतन्य झाल्याशिवाय "थोर आनंद जाहला" असे म्हणता यावयाचेच नाही. तेव्हा तशी स्थिती प्राप्त होण्याला रामनवमी पासून पौर्णिमेपर्यंत भक्तियोग केला पाहिजे म्हणजे पौर्णिमेस मारुतीराय अर्थात सद्भक्तीची दिव्य मूर्ती हृदयांत प्रगट होईल. ह्या सहा दिवसांत साधकानें भक्ति योगाच्या साधनाने :- ***"एवं बुद्धे: परं बुद्ध्वा सस्तभ्यात्मा नमात्मना। जहि शत्रुं महाबाहो कामरुपं दुरासदम्।।"*** (भ.गी. ३/४३), बुद्धि पलिकडे असलेल्या आत्म्याला जाणून कामादि शत्रूंना मारून आत्म्याच्या ठायी बुद्धि स्थिर करून कृतकृत्य व्हावे. मग भक्तिसुखाचा पूर्ण आस्वाद घ्यावयास सापडेल. नाही तर हा कामरुपी तस्कर ज्ञानासारख्या अनर्घ्य रत्नाचें क्षण न लागतां हरण करील. यासाठी सावधगिरीने राहून, सद्गुरुचें नाम घेऊन चित्तचैतन्य करून घ्यावे. ***"सद्गुरुचें निज नाम एक। निवारी बाधा महादेख। उपजे वैराग्य अलौकिक। तेणें होय निज सुख साधका।।"***

**– नारायण –**

।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।

# श्री सद्गुरु
# श्री दादाभाईंचे प्रवचन

**गुरुवार : २९.४.४३**
**सकाळी : ६.५० ते ७.१०**

कोणताही ग्रंथ वाचायचा झाल्यास त्याचा आरंभ, मध्य व शेवट असतो तो सर्व कळतो असे लोकमान्य टिळक म्हणतात त्याप्रमाणे गीतेचा आरंभ मध्य व शेवट वाचला सर्व गीता वाचल्यासारखे होईल व आता गीतेला आरंभ कसा झाला हे पाहू.

अर्जुन हा पूर्ण योद्धा होता त्याने भारतीय युद्धप्रसंगी श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्याच्या मध्ये नेण्यास सांगितले व मोठ्या ईर्षेने म्हणाला पाहू या तर खरी माझ्याबरोबर लढण्यास कोण कोण आले आहेत ? भगवंताने तो नेला व सांगितले असे पार्था पहा, नीट पहा असे म्हणून त्याच्या बुद्धिची कळ फिरविली व त्यांच्यात पार्थ ह्या शब्दाबरोबर करुणा उत्पन्न केली.

*अध्यायीं प्रथमांत पार्थ स्वजना देखोनिया मोहिला।*
*कीं हे गोत्रज, सोयरे, कुल गुरु, मारीच ना मी मला।।*
*लागे पाप म्हणोनि युद्ध न करी कृष्णा असे बोलिला।*
*बाणेंसी धनु टाकुनि मग रथीं तो उगला बैसला।*



गीतेचा प्रथमाध्याय म्हणजे अर्जुन विषाद आहे. यासंबंधी अनेक लोकांची अशी समजूत आहे की भगवंताने कौरव सैन्यांत रथ नेताच पार्थाला वैराग्य झाले व त्यांच्यात त्यांच्याबद्दल मोह उत्पन्न झाला पण हे मत चुकीचे आहे. कारण पार्थ आपल्या आप्तेष्टांना पूर्वीपासून ओळखत होता व तसे जर असते तर त्याने भगवंताला मोठ्या ईर्षेने आपला रथ मध्ये घेऊन चला व मला पाहू दे कोण कोण माझ्याशी दोन हात करण्यास आले आहेत असे सांगितले नसते. ह्याबद्दल श्री वामन पंडितांनी यथार्थ दिपीकेत फार सुंदर वर्णन केले आहे आणि म्हणूनच ते आमच्या परंपरेतले नसून आम्हांला अत्यंत प्रिय आहेत. गीतेंतील हा मुद्दा जर समजला नाही तर सर्व गीता समजणार नाही.

*शांतादुर्गे मातें अससी तूं शुद्धसात्विकी माया।*
*दे मती भजनी रमाया घालवुनी रजतमादिकी माया।।*

परंतु ह्या लेखकांना श्री वामन पंडित काय म्हणतात हे कळले नाही. असो. आता ह्याबद्दल श्रीभाई काय म्हणतात ते पाहू :-

DE CARMINE DEI DEORUM or on the song of the God of Gods.

Part I page 85 to 86.

"Sanjaya again names Shri Krishna ----------- but also to the whole world."

*शांतादुर्गे माते अससी तूं शुद्धसात्विकी माया।*
*दे मती भजनी रमाया घालवुनी रजतमादिकी माया।।*
*गीतारुपें प्रगटसी श्रीकृष्णमुखेंची पार्थ बोधाया।*
*वत्समिषें जगंदबे उपाय करिसी जनांही ताराया।*

"Instead of calling Arjuna by that usual familiar name, -------- -------- such is the miraculous power of the word of God.

आता हेंच आपण मराठीत वाचूं

(षड्ध्यायी गीता ———-

अर्जुनाने सदर प्रसंगी ———- आणिबाणीच्या वेळी ज्ञान—-- हरिकथा श्रवण ————- (पूर्ण)

ही मुक्ति सोडून द्यावी कारण :–

***तुका म्हणे मुक्ति पर्णिली तोवरी ।***

***आतां दिवसचारी खेळींमेळी ।।***

वरची मूर्ती घ्यावी. चारी मुक्तिला मुक्ती देणारी ही मुक्ति आहे.

आता मनोभूत्तिका शुद्ध झाल्यावर भगवंताने त्याला hypnotise केले तेव्हा तो मी युद्ध करीत नाही असे म्हणू लागला. भगवंताच्या मुखांतून निघालेले ते शब्द त्यांनी इष्ट तोच परिणाम केले.

***तयांचे शब्द मनीं रुतलें ।।धृ. ।।***

***पण कोणाचे तर ।***

***हरिगुण गातां प्रेम जनानें सर्वांगी धुतलें ।।१ ।।***

भगवंताचे गुणानुवाद गात असतां ज्यांच्या आठही गात्रांतून प्रेम बाहेर पडते. त्यांचेच शब्द परिणामकारक होतात. मग श्रीकृष्ण तर सर्व प्रेमाची मूर्तीच त्या शब्दांचा अर्जुनावर परिणाम झाला तर काय नवल?

अर्थात अर्जुनाला ————— (पूर्ण)

तात्पर्य ही सर्व भगवंताची करणी आहे. पार्थाला वैराग्य उत्पन्न होण्यासाठी भगवंताने ही युद्ध प्रसंगाची वेळ ठरवली. श्री वामन पंडितांनी ह्याचे सुंदर वर्णन केले आहे पण हे रहस्य त्यांना कसे समजले? तर त्यांनी आपला सर्व मोठेपणा श्रीकृष्णचरणीं अर्पण केला.

***नेणे काहीं ज्ञान । नेणें काही भजन ।***

***एक शेषशायी कमलनयन दैवत इतुके जाणतो ।।***

***हा भावही देवोनि जतन । करितो तोचि शेषशयन ।***

***म्हणोनि गीतार्थ अतिगहन । तोचि कमलनयन सुचवी ।।*** (वा.प.)

असो. हा गीतेचा मुख्य मुद्दा आहे. तो समजला पाहिजे त्यावर



पुढची गीता अवलंबून आहे. गीता ही भक्तिपर आहे.

***य इंद परमं गृह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ।***

***भक्ति मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशय ।। (भ.गी.)***

भगवान म्हणतात जो माझी भक्ति माझ्या इतर भक्तांना समजून सांगतो त्याला माझीच प्राप्ती होईल मग त्याला योगयाग करण्याची जरूरी नाही. पण ही ज्ञानोत्तर भक्ती जी उद्धवानें भगवंतापाशी मागितली ती आहे तिची प्राप्ती होण्यास आरंभी गौणी भक्ती केली पाहिजे. ही गौणी भक्ती करण्यास सत्संगत केली पाहिजे. मग तेथे यथाकाळीं ज्ञान होऊन गुरुकृपेने ही भक्ती प्राप्त होईल व शेवटी वैकुंठवास मिळेल तेव्हा ह्या दोन्ही भक्ती आपण आता मागू.

***हरी तुझी भक्ती मला देई । प्रभो तुझी प्रीति मला देई ।।धृ. ।।***

***या भवसागरी भक्ती तुझी प्रभो । तारक नौका खरी ।।१ ।।***

***त्रिदोषरहिता अति पवित्रा । आवड तुझी देई ।।२ ।।***

***भक्ति अशी तुझी माताच केवळ ज्ञानविरागाची ।।३ ।।***

भक्ति ही माता आहे. (ज्ञानदेवं तूं कैवल्यम्) हे श्रुतिवचन खरे आहे. पण हे ज्ञान भक्ति शिवाय कसे उत्पन्न होणार. भक्ती ही ज्ञान वैराग्याची माता आहे. म्हणून आचार्य अद्वैतमताचे पुरस्कर्ते असून म्हणतात (मोक्षकारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी।।)

***शंकर म्हणजे विभो ठाव अखंडित । दे मज तव चरणीं ।।४ ।।***

देवाला सांगतात प्रथम भक्ति दे मग त्यायोगे ज्ञानवैराग्य उत्पन्न होऊन त्याची प्राप्ती होईल व मग तुझ्या चरणी अखंड वास मिळेल. तिला गंगा सागर संगमभक्ति म्हणतात.

***गंगा-सागररीती भक्तिमज द्यावी । कींव माझी यावी पांडुरंगा ।।१ ।।***

***कुंतीसी देवोनी कौंतेया दिधली । तेंचि मागितली सद्गुरुराये ।।२ ।।***

***त्यांची इच्छा पूर्ण करोनी त्वा कृष्णें । आतां मागें सरणें अनुचित ।।३ ।।***

***म्हणोनी विनवी तुमचे लेकरू । जरी खोडकरूं सांभाळावे ।।४ ।।***

हे कृष्णा, कुंतीला व कौंतेयाला जी भक्ती दिली तीच आम्हा बालकांना दे.

***

श्रीवा. पंडितांनी यथार्थ दीपिका लिहून झाल्यावर ती भगवत्‌चरणी अर्पण केली. भगवंताने ती उचलून हृदयावर ठेवली ह्यात काय दर्शविले की भगवान म्हणतात, वामना तू माझे हृद्गत सांगितलेस, श्री वामन पंडित म्हणजे परम कृष्णभक्त मंगलचरण ही श्रीकृष्णाचेच ते म्हणतात श्री कृष्णाची प्राप्ती पाहिजे तर गणपतीचे स्तवन का करावी ? मग भगवान का त्यांच्यावर प्रेम करणार नाही व का आपले हृद्गत् सांगणार नाही.

वास्तविक गणपती, श्रीकृष्ण एकच सर्व ॐकारांतून निघाले.

सद्गुरुही तोच ——————————-

***ॐकार स्वरुपा सद्गुरु समर्था। अनाथाच्या नाथा तुजनमो ।।१ ।।***
***एका जनार्दनी गुरु परब्रह्म। तयाचें पै नाम सदा मुखीं।।***
***सद्गुरुचे निजनामचि एक। निवारी बाधा महादोख।***
***वैराग्य उपजवी अलौलिक।। तेणें होय निजसुख साधकां।।*** (ए.भा.)

म्हणून श्री निळोबाराय म्हणतात :-

***नित्य सद्गुरुची आळवितां नामे। येतीं निजधामें भेटो सये।।१ ।।***
***निळा म्हणे माझ्या सद्गुरुची मूर्ती।***
***सकळाही विश्रांती विश्रांतीसी।।४।।***

जगतांतील सर्व विश्रांती सद्गुरुचरणांकडे विश्रांती घेण्यास येतात.

***



# विशेष निवदेन

सर्व भक्तांना कळविण्यास आनंद होतोय की आपले संकेत स्थळ, अर्थात वेबसाईट, www.sadbhaktimandir.com आता पूर्णत: कार्यरत झाले आहे. श्री दत्तगुरुंची कृपा, श्री नारायण महाराज जालवणकरांची आज्ञावजा प्रेरणा आणि प.पु. सद्‌गुरु श्री टाकी महाराज ह्यांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

सद्भक्ती मंदिर, प.पू. श्री टाकी महाराज (तिन्ही पिढ्या), श्री दत्तगुरु परंपरा, संत साहित्य, संत चरित्र, काही निवडक पदांचे श्राव्य प्रसारण (ऑडिओ), काही फोटो, आगामी उत्सव किंवा कार्यक्रमांची माहिती आणि इतर आवश्यक बाबी, इत्यादी उपयुक्त माहिती ह्या संकेत स्थळावर दिली आहे.

सद्भक्ती प्रकाश हे आपले त्रैमासिक देखील ह्या संकेत स्थळावर उपलब्ध केले जाते. सदरहू त्रैमासिक देखील योग्य समयी अपलोड केले जाईल. जिज्ञासूंनी ह्या संकेत स्थळाला जरूर भेट द्यावी आणि आमच्याशी संपर्क साधावा. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हे आपले Facebook सदर (पेज) सुद्धा कार्यरत होत आहे.

सर्व भक्तांना विनंती आहे की त्यांनी आपल्या व्हॉट्सॲप आणि फेसबुक वरील आणि इतर मित्र परिवारात, ह्या आपल्या दोन्ही प्रसार स्थळांची माहिती देऊन सद्भक्ती मंदिर आणि सद्भक्तीपंथ ह्यांचा जास्तीत जास्त प्रसार होऊन आपल्या प.पु. सद्गुरुंचे विचार आणि त्यांची शिकवण सर्वत्र प्रसिद्ध होण्याकरिता हातभार लावून गुरुसेवेच्या ह्या संधीचा लाभ घ्यावा.

## परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

### अमृत कण

१) ज्या पुरुषास आत्मानुभवाची उत्कंठा लागते त्यास ईश्वर सद्गुरुच्या रूपाने दर्शन देतो व त्याजवर कृपा करतो. ईश्वराने कल्पवृक्षस्वभाव धारण केल्यामुळे तो दयाळु असूनही त्यास मागितल्यावाचून कोणास काहीच देता येत नाही. शिवाय इच्छेवाचून मागणे होत नसल्यामुळे चित्तशुद्धि झाल्यावाचून तीव्र इच्छाही होत नाही. ज्याच्या पोटी जाड्यांश असतो, त्यास क्षुधा चांगली नसते; म्हणून त्याचे अन्नासाठी प्रयत्नही शितल असतात. वास्तविक पहातां शिष्यप्रज्ञाच ज्ञानास कारण होते.

२) आईबाप मुलास कोणत्या एका मार्गानें वर्तण्यास लावीत असताही तो पूर्वकर्माच्या संस्काराने तो मार्ग सोडून दुसऱ्याच वर्गात शिरतो, हे सर्वास ठाऊक आहे. एवं बुद्धीस बरे वाईट करावयास लावण्यास आपणच कारण आहोत, हे लक्षात ठेवले पाहिजे. श्रीभगद्गीतेतही 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मेंव रिपुरात्मना' हाच सिद्धांत सांगण्यात आला आहे.

३) नुसते श्रद्धेनें ईश्वराचे भजन केल्यामुळें ज्यास आतां सत्संगति प्राप्त झाली असेल त्यानें पहिल्याने चित्तशुद्धी करता काही काळ श्रवण-कीर्तनादि भक्ति केली पाहिजे.

४) विषय हे भासरूप आहेत असे पाहणे हीच साधकाची विरक्ती किंवा वैराग्य होय व विषयांकडून वृत्तीस परावृत्त करून स्वरूपाकडे लावणे हीच साधकाची भक्ती होय. सत्त्ववृत्ती



स्वरूपाशी तदाकार होऊ लागली म्हणजे साधकास 'मी विद्वान वृत्तिप्रतीति शुद्ध ते ज्ञान' असा अनुभव येतो व हेच त्याचे ज्ञान होय. असा अनुभव येत नसला म्हणजे 'नारायण-नारायण, हरि-हरि' असे नामस्मरण करून भगवंतास आळवावे म्हणजे वृत्ति आपोआप स्वरूपात जाईल.

५) मुमुक्षूचे भक्ति-ज्ञान-वैराग्य हा परमार्थातील पहिला टप्पा होय. साधकाचे भक्ति-ज्ञान-वैराग्य हा दुसरा टप्पा होय व सिद्धाचे भक्ति-ज्ञान-वैराग्य हा तिसरा टप्पा होय.

६) गुरु हा परब्रह्माहून श्रेष्ठ आहे. कारण श्रीगुरूची कृपा झाली तर शिष्याला परब्रह्माचा पूर्ण बोध होतो. कोणत्याही जिज्ञासूस सद्गुरुच्या ठिकाणी ईश्वरभाव उत्पन्न झाल्याशिवाय आत्मसाक्षात्कार होणेच शक्य नाही. आणि असा ईश्ववरभाव उपजणे हेच सद्गुरूरूपाने ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन होय. पुढे त्याच्याच कृपाप्रसादे आत्मसाक्षात्कार होतो.

७) निष्काम-ईश्वरार्पणावाचून निजप्राप्ति होणे अगदी अशक्य आहे. हे ईश्वरार्पण सत्संगतीत सच्छात्र परोक्षरीतीने श्रवण करून आत्मा म्हणजे आपण निर्गुण, निष्क्रिय असून देहाच्या संपूर्ण क्रिया व भोग प्रकृतीच्या गुणांपासून ईश्वरसत्तेने पूर्वसंस्कारानुरुप आपोआप घडून येतात अशा उत्पन्न होणाऱ्या श्रद्धेनेच होत असल्यामुळे ही श्रद्धा माझ्यामध्ये उत्पन्न होऊन तिच्या योगाने होणाऱ्या चित्तशुद्धीनें नवविधभक्तिद्वारा तुझ्या कृपेने व्यतिरेकान्वयज्ञानाचा मला पूर्ण अनुभव येऊ दे.

✦✦✦

।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

## (जुलै ते डिसेंबर २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव

यापुढे लॉकडाऊन व बंधन संपून आपण सर्वजण हे उत्सव साजरे करू शकू अशी आशा व श्री सद्गुरुंची प्रार्थना करूया :-

**वैशाख मास : गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथ्योत्सव**

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. ९.६.२०२१ (वैशाख वद्य १४) | गुरुवर्य श्री बाबांचा पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. 'पितापुत्र व गुरुशिष्य प्रेम' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |
| शुक्रवार | दि. ११.६.२०२१ (ज्येष्ठ प्रतिपदा) | गंगादशहरा प्रारंभ. सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ. |
| शनिवार | दि. १२.६.२०२१ (ज्येष्ठ २) | सायंकाळी ६ वाजता नाम संकीर्तन. |
| रविवार | दि. १३.६.२०२१ (ज्येष्ठ ३) | गुरुवर्य श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. उत्सव समाप्ती. गुरुवरांनी आम्हा अज्ञ बालकांची सेवा गोड मानून घ्यावी अशी कळकळीची प्रार्थना. |
| रविवार | दि. २०.६.२०२१ (ज्येष्ठ शुद्ध १०) | गंगावतरण दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

**आषाढ मास: (जुलै ते सप्टेंबर २०२१) महिन्यातील उत्सव व महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. ५.७.२०२१ (ज्येष्ठ कृ ११) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. २०.७.२०२१ (आषाढी एकादशी - देवशयनी एकादशी) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |



| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. २३.७.२०२१ (आषाढी पौर्णिमा - गुरुपौर्णिमा) (व्यास पौर्णिमा) | गुरुपौर्णिमा. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता पादुकांस एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता परमार्थदीपिका वाचन. |
| रविवार | दि. २५.७.२०२१ (आषाढी वद्य द्वितीया) | परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाई जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता जन्मोत्सव. पाळणा व इतर पदे. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| सोमवार | दि. २६.७.२०२१ (आषाढी वद्य तृतीया ) | नामसंकीर्तन. |
| बुधवार | दि. २८.७.२०२१ (आषाढी वद्य पंचमी ) | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंतीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| गुरुवार | दि. २९.७.२०२१ (आषाढी वद्य षष्ठी ) | सायंकाळी ५.३० वाजता सद्गुरु नारायण महाराज व सद्गुरु दादाभाई विरचित ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण व समाप्ती दिन. कळकळीची विनंती. |

**ऑगस्ट :**

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १.८.२०२१ | इंग्रजी तारखेनुसार गुरुवर्य श्री भाईंचा जयंतीदिन. |
| शुक्रवार | दि. ६.८.२०२१ (आषाढी वद्य त्रयोदशी) | श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. ७.८.२०२१ (आषाढी वद्य चतुर्दशी) | श्री सावतामाळी पुण्यतिथी दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

**श्रावणमासारंभ :**

| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. १८.८.२०२१ (श्रावणशुद्ध ११) (पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाईंची जयंती. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन व इतर पदे. सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव, पाळणा व इतर पदे. |
| रविवार | दि. २२.८.२०२१ (श्रावण पौर्णिमा - नारळी पौर्णिमा) | श्रावणी व होमहवन इत्यादी. |
| सोमवार | दि. २३.८.२०२१ (श्रावण वद्य प्रतिपदा) | श्री सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. २९.८.२०२१ (श्रावण वद्य सप्तमी) | श्री लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन. |
| सोमवार | दि. ३०.८.२०२१ (श्रावण वद्य अष्टमी) | जन्माष्टमी श्री कृष्ण जयंती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. श्रीकृष्ण जन्मोत्सव रात्रौ १२ वाजता. रात्रौ १० ते १२ श्री रमा वल्लभदासांची पदे व त्यानंतर जन्म व पाळणा व पदे, प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ३१.८.२०२१ (श्रावण वद्य नवमी) | गोपाळकाला. सद्भक्ती मंदिराचा वर्धापन दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी व इतर पदे. |

**भाद्रपद मास :**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १०.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध चतुर्थी) | श्री गणेश चतुर्थी. स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. १७.९.२०२१ (भाद्रपद शुद्ध ११) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |



| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि. २१.९.२०२१ (भाद्रपद वद्य प्रतिपदा) | सद्गुरु श्री दादाभाई महालय दिन. प्रात: स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |

**(ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१)**

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २.१०.२०२१ | श्री बलभीम महाराज पुण्यतिथी. सकाळी ७ वा. स्तवन व प्रार्थना. |
| गुरुवार | दि. ७.१०.२०२१ (आश्विन शुद्ध प्रतिपदा) | घटस्थापना. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता नवरात्रौपासन, दुर्गास्तोत्र, व 'कलौ चंडी विनायको'चे वाचन. |
| गुरुवार | दि. १४.१०.२०२१ | श्री रामेश्वर मंदिरात सद्भक्ति प्रसारक मंडळातर्फे रात्रौ रंगपूजा, आरती व प्रसाद. |
| शुक्रवार | दि. १५.१०.२०२१ (आश्विन शुद्ध १०) | विजयादशमी - दसरा. सद्भक्ती प्रसारक मंडळींचा वाढदिवस. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता प्रवचन, वाचन व सोने वाटप. सायंकाळी ५.३० वाजता पालखी मिरवणूक. ही पालखी सारस्वत कॉलनी व हिंदू फ्रेंडस सोसायटी. या दोन्ही सोसायट्यामधून प्रस्थान करते. |

**गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि. १९.१०.२०२१ (आश्विन पौर्णिमा - कोजागिरी पौर्णिमा) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या प्रथम पुण्यतिथी दिनी झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. सायंकाळी ७ वाजता श्री कृष्ण भक्तिपर पदे व रासलिलाभिनय. |

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २३.१०.२०२१ (आश्विन वद्य तृतीया) | गुरुवर्य व भाईंची पुण्यतिथी व श्री बाळेकुंद्री महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वा. एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन व इतर पदे. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| रविवार | दि.२४.१०.२०२१ | नामसंकीर्तन सायं. ५.३० वा. |
| सोमवार | दि. २५.१०.२०२१ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| मंगळवार | दि. २.११.२०२१ (आश्विन वद्य द्वादशी) | गुरुद्वादशी - सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता गुरुद्वादशी निमित्य झालेल्या गुरुवर्य श्री भाईंच्या प्रवचनाचे वाचन. ८.३० वाजता पालखी मिरवणूक. |
| गुरुवार | दि. ४.११.२०२१ (आश्विन वद्य चतुर्दशी) | नरकचतुर्दशी. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता श्री रामेश्वर मंदिरात 'उद्धव-गोपी' गीताचे सामुदायिक भजन व इतर पदे. |
| शुक्रवार | दि. ५.११.२०२१ (आश्विन वद्य प्रतिपदा) | बलिप्रतिपदा. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता सुखासना निमित्त झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन ११.३० वाजता एकादशणी. |
| रविवार | दि. १४.११.२०२१ (कार्तिकी - प्रबोधिनी एकादशी) | प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.०० वाजता 'पंढरीचा प्रसादमेवा' या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. |
| गुरुवार | दि. १८.११.२०२१ (कार्तिक शुद्ध चतुर्दशी - वैकुंठ चतुर्दशी | गुरुवर्य श्री भाईंचा अस्थिविसर्जन दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. ८.३० वाजता कमळे वाहणे. |
| शुक्रवार | दि. १९.११.२०२१ (कार्तिक पौर्णिमा - त्रिपुरारी पौर्णिमा) | सकाळी स्तवन व प्रार्थना. रात्रौ ८.३० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |



| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २७.११.२०२१ (कार्तिक वद्य सप्तमी - अष्टमी) | श्री काळभैरव जयंती. प्रात: स्मरणानतर स्तवन व प्रार्थना. |
| गुरुवार | दि. २.१२.२०२१ (कार्तिक वद्य त्रयोदशी) | श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

## गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव

| | | |
|---|---|---|
| सोमवार | दि. १३.१२.२०२१ (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता **एकादशणी.** |
| मंगळवार | दि. १४.१२.२०२१ (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - मोक्षदा एकादशी) | श्री गीता जयंती व श्री माणिक प्रभु महाराज पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता सामुदायिक गीता पठण. सायंकाळी ५.३० वाजता श्री गीताजयंती निमित्य झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाने वाचन. |
| शनिवार | दि. १८.१२.२०२१ (मार्गशीर्ष पौर्णिमा) | श्री दत्तजयंती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता **एकादशणी.** त्यानंतर महाप्रसाद. जन्मोत्सव सायंकाळी ६ वाजता पाळणा व इतर पदे. रात्रौ ८.३० वाजता पालखी व मिरवणूक. |
| रविवार | दि. १९.१२.२०२१ | सायंकाळी ६ वाजता **नामसंकीर्तन** व सुमधुर पदे. |
| सोमवार | दि. २०.१२.२०२१ | उत्सव समाप्ती व कळकळीची प्रार्थना. सायंकाळी ६ वाजता **ध्वनिमुद्रित** पदांचे श्रवण. |
| शनिवार | दि. २५.१२.२०२१ | श्री मोरया गोसावी पुण्यतिथी व श्री येशूख्रिस्त जयंती दिन व सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २९.१२.२०२१ | श्री रंगनाथ स्वामी पुण्यतिथी सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सायंकाळी भजनाचे वेळी चरित्र वाचन. |

✦✦✦

# महत्वाच्या सूचना

ह्या अंकातील आणि ह्या आधीच्या अंकातील उल्लेख केलेले उत्सव - महोत्सव आपल्या सद्भक्ती मंदिरातील प्रथेनुसार देण्यात आलेले आहेत. परंतु विद्यमान सरकारी आदेश आणि त्याप्रमाणे पाळण्यात येणारा लॉक डाऊन ह्यामुळे एप्रिल ते जून महिन्यातील उत्सव थोडक्यात आणि अल्पावधीत फक्त गुरुजींच्या हस्ते आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरे करावे लागले होते.

तसेच पुढील उत्सव सालाबादप्रमाणे साजरे केले जाणार की वर उल्लेख केल्याप्रमाणे थोडक्यात ओटोपते घ्यावे लागणार हे त्या त्या वेळेस जाहीर केल्या जाणाऱ्या सरकारी आदेशांवर अवलंबून असेल. सद्य परिस्थितीत सरकारी आदेशानुसार कोणताही उत्सव अत्यंत छोट्या प्रमाणात, म्हणजे केवळ गुरुजी आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरा करावा लागणार आहे. पुढील सूचना येईपर्यंत तरी सर्व भक्तांना विनंती आहे की ह्या पुढील उत्सवांच्या तारखांच्या एक किंवा दोन दिवस आधी त्यांनी खालीलपैकी एखाद्या भक्ताशी संपर्क करून नंतरच सद्भक्ती मंदिरात दर्शनाला यावे, जेणेकरून सद्भक्तांची निराशा आणि गैरसोय होणार नाही.

१. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
२. श्री. समीर रायकर - दू. भ्र. क्र. ९८२००८४०३०
३. श्री. रोहन दळवी - दू. भ्र. क्र. ९८६७४९४७४७
४. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

**टीप** : उत्सवाचे वेळी सध्या आपले माननीय गुरुजी पहाटे सूर्योदयसमयी गाभाऱ्यात, आतल्या आत श्री दत्तगुरुंची नित्यपूजा करतात आणि सर्व पादुकांना अभिषेक करतात. भक्तमंडळी आपापल्या घरी नामस्मरण, वाचन करतात. सरकारी आदेशानुसार भक्तांना दर्शनाकरिता मंदिरात सध्या प्रवेश नाही.

दररोज श्री दत्तगुरुंची नित्यपूजा माननीय गुरुजी पहाटे सूर्योदय समयी करतात. सरकारी नियमाचे पालन करूनच इतर सेवा शक्य तितक्या केल्या जातात.



# विनंती

सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक आजवर आपण इ.स. १९२८ सालापासून प्रसिद्ध करीत आहोत. सद्गुरु श्री भाई, श्री दादाभाई ह्यांचे आणि इतरही संतांचे विचार सर्वत्र प्रसारित होऊन, सद्भक्ती मंदिरातील घडामोडींचा आढावा आणि नजीकच्या काळात होणाऱ्या उत्सव-महोत्सवा विषयीची समग्र माहिती ह्या त्रैमासिकातून भक्तगणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ह्या नियतकालिकातर्फे आपण करीत असतो.

मुंबई शहराबाहेरील सभासदांना त्यांची प्रत पोस्टाने पाठवली जाते. तर स्थानिक सभासद सद्भक्ती मंदिरात येऊन आपापली प्रत घेऊन जातात.

गेल्या काही वर्षात छपाईच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. सभासदांकडून जी काही वर्गणी पूर्वी घेतली आहे ती त्या काळात योग्य अशीच होती किंवा असावी. मात्र आता त्या वर्गणीच्या रकमेमध्ये हा छपाईचा आणि पोस्टाचा खर्च अजिबात भागत नाही.

**सभासदांकडून अधिक वर्गणी मागण्याची सद्भक्ती प्रसारक मंडळींची इच्छा नाही.**

त्या ऐवजी अलीकडेच विकसित झालेल्या आपल्या वेबसाईटवर सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक अपलोड केले जाईल.

ज्या सभासदांना इंटरनेटची सुविधा नाही किंवा इतर काही कारणामुळे वेबसाईट वरील माहिती वाचणे शक्य नसेल त्यांनी खालीलपैकी एखाद्या कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. आपापले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस (असल्यास) पाठवून द्यावेत.

ज्यांना हे शक्य आहे त्यांना विनंती आहे की त्यांनी देखील आपले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस वर उल्लेख केलेल्या कार्यकर्त्यांपैकी कुणालाही पाठवून द्यावा, जेणेकरून जेव्हा त्रैमासिक अपलोड केले जाईल तेव्हा त्याची सूचना देता येईल.

**सर्व सभासदाना विनंती आहे की ह्या विनंतीच्या संदर्भात त्यांनी जरूर संपर्क साधावा.**

**संपर्क :-**

१. श्री. विवेक ताम्हाणे - दू. भ्र. क्र. ९८२०३५०८६७
२. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
३. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

✦✦✦

# : निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the Account** | : | **SADBHAKTI PRASARAK MANDALI** |
| **Bank Name** | : | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | : | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | : | NKGS0000006 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | : | Bank Of India |
| **Account No** | : | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | : | BKID0000164 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.



**Mr. Vivek Tamhane**

Tamhane & Mehta (Chartered Accountants)

1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,

Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.

**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | | |
|---|---|---|
| **१. श्री. विवेक ताम्हाणे** | **भ्रमणध्वनी** | **: ९८२०३५०८६७** |
| **२. श्री. नागानंद निळेश्वर** | **भ्रमणध्वनी** | **: ९८२१२७०७७२** |
| **३. श्री. अरूण विजयकर** | **भ्रमणध्वनी** | **: ९२२३२२२२४५** |

✦✦✦